# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : २
## <u>सभावृत्तांत</u>

दिनांक : १६/०७/२०१० वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.१६/७/२०१० रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.काळुराम मारुती पवार - सभापती
२. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३. मा.मोहिनी विलास लांडे
४. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
५. मा.भारती ज्योती सुखलाल
६. मा.घुले रघुनंदन रामभाऊ

याशिवाय मा. देशमुख - सहा.आयुक्त ,मा.काळे -नगरसचिव, मा.ढगे, मा.निकम, मा.इंगळे - कार्य.अभियंता,मा.कांबळे - सहा.नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-</u>

विषय क्रमांक :- ८) चिंचवड येथील जलतरण तलाव आवारात व्यायामशाळा इमारत बांधणेबाबत..

विषय क्रमांक :- ९) ब प्रभागातील नाल्यांमध्ये जुन्या झालेल्या मुख्य मलवाहिन्या टाकणेबाबत..

विषय क्रमांक :- १०) नेवाळे वस्ती येथील पंपींग स्टेशन शेजारी वॉचमन क्वॉर्टर बांधणेबाबत..

अ) दिनांक १८/६/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २४ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ६/७/२०१० रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- ४ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १६/७/२०१० विभाग : स्थापत्य उद्यान
सुचक :- मा.शकुंतला धराडे अनुमोदक :- मा.मोहिनी लांडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/जा/कावि/४६६/१० दि.३०.६.१०
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

भोसरी स.नं. २२७/१ (राधानगरी सोसायटीजवळ) मोकळ्या जागेत उद्यान विकसित करणेकामी र.रु.२४,९९,०००/- चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५ विषय क्रमांक :- २
दिनांक :- १६/७/२०१० विभाग : प्रशासन
सुचक :- मा.ज्योती भारती अनुमोदक :- मा.वसंत लोंढे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/६६४/१० दि.०१.७.१०
विषय :- डॉ.रोकडे, डॉ.सोनवणे व डॉ.मदने, वैद्यकिय अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीवर केलेल्या नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत..

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १६/७/२०१० विभाग : स्थापत्य
सुचक :- मा. शकुंतला धराडे अनुमोदक :- मा.मोहिनी लांडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/७६३/१० दि.३०.६.१०
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

वॉर्ड क्र. ६ चिखली चौकामध्ये नविन शाळा इमारत बांधणेकामी र.रु. ३६,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ७ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- १६/७/२०१० विभाग : पाणीपुरवठा ब
सुचक :- मा.रघुनंदन घुले अनुमोदक :- मा.वसंत लोंढे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बप्र/पापु/कावि/११२४/२०१० दि.३०.६.१०
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

चिखली मैला शुध्दीकरण केंद्र अंतर्गत सिमाभिंत बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी र.रु. ४८,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ८ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- १६/७/२०१० विभाग : स्थापत्य ब प्रभाग
सुचक :- मा. शकुंतला धराडे अनुमोदक :- मा. मोहिनी लांडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कावि/३१६/२०१० दि.३.७.१०
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

वाल्हेकरवाडी येथील शाळा इमारतीच्या दुस-या मजल्याचे बांधकाम रद्द करून स्थानिक नगरसदस्यांनी केलेल्या मागणीनुसार कामाच्या स्वरूपात बदल करून वाल्हेकरवाडी येथील शाळा इमारतीच्या दुस-या मजल्याचे विस्तारीकरण करणे या कामाच्या ऐवजी निविदेअंतर्गत वाल्हेकरवाडीमधील मनपाचे शाळा व दवाखाना इ. इमारतीचे मजबुतीकरण, डागडुजी व इतर स्थापत्य विषयक कामे करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. (अंदाजपत्रकीय र.रू. २९,११,४००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ९ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- १६/७/२०१० विभाग : पाणीपुरवठा क प्रभाग
सुचक :- मा.वसंत लोंढे अनुमोदक :- मा.ज्योती भारती
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कप्र/कावि/३६/२०१० दि.३०.६.१०
विषय :- वॉर्ड क्र.३३ खराळवाडी येथील जुन्या पाईपलाईन काढून नविन पाईप लाईन टाकणेबाबत..

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १० विषय क्रमांक :- ७
दिनांक :- १६/७/२०१० विभाग : नगररचना व विकास
सुचक :- मा. शकुंतला धराडे अनुमोदक :- मा. मोहिनी लांडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/५/८५/२०१० दि.६.७.१०
विषय :- पुणे महानगर नियोजन समितीच्या खर्चासाठी सन २००९ -२०१० या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पीय तरतुद करणे व पदांच्या निर्मितीबाबत..

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक :- ११ विषय क्रमांक :-८
दिनांक :- १६/०७/२०१० विभाग - ब प्रभाग स्थापत्य
सुचक :- मा.रघुनंदन घुले अनुमोदक :- मा.ज्योती भारती
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.बप्र/स्था/कावि/७/२९४/२०१० दि.१५/७/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले्प्रमाणे..

चिंचवड येथील जलतरण तलाव आवारात व्यायामशाळा इमारत बांधणेकामीर.रु.३२,४०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२ विषय क्रमांक :-९
दिनांक :- १६/०७/२०१० विभाग - ब प्रभाग पाणीपुरवठा
सुचक :- मा. शकुंतला धराडे अनुमोदक :- मा. मोहिनी लांडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/कावि/१२२७/२०१० दि.१५/७/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्‌प्रमाणे..

ब प्रभागातील नाल्यांमध्ये जुन्या झालेल्या मुख्य मलवाहिन्या टाकणेकामी र.रु.४९,९२,१००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १३ विषय क्रमांक :-१०
दिनांक :- १६/०७/२०१० विभाग - जलनि:सारण
सुचक :- मा.वसंत लोंढे अनुमोदक :- मा.ज्योती भारती
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/जनि/१२२८/२०१० दि.१५/७/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्‌प्रमाणे..

नेवाळे वस्ती येथील पंपींग स्टेशन शेजारी वॉचमन क्वॉर्टर बांधणे व स्थापत्य विषयक कामे करणेकामी र.रु.२३,७५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(काळुराम मारुती पवार)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/१०००/१०

दिनांक- १७/७/२०१० चे लगत

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.